पुढारी

# चप्पल विक्रेत्यांच्या कौशल्य विकासासाठी विद्यापीठ कटिबद्ध

कोल्हापूर : प्रतिनिधी

कोल्हापूरचे वैशिष्ट्य आणि वैभव असणाऱ्या कोल्हापुरी चप्पलचे निर्माते आणि विशेषत: विक्रेत्यांच्या कौशल्य विकासासाठी शिवाजी विद्यापीठ कटिबद्ध आहे, अशा भावना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी बुधवारी व्यक्त केल्या. शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने आणि कोल्हापुरी चप्पल क्लस्टरच्या सहकार्याने चप्पल लाईन येथे एकदिवसीय ऑन फिल्ड प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. नांदवडेकर म्हणाले, बाजारामधील नवप्रवाहांची जाणीव करून देणे आणि त्यांच्या विपणन पद्धतीमध्ये कालसुसंगत बदल घडवून आणणे आवश्यक आहे. त्यासाठी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या माध्यमातून थेट कोल्हापूरच्या चप्पल लाईनमध्येच एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. एका अर्थाने या चप्पल विक्रेत्यांच्या कौशल्य विकासासाठी 'विद्यापीठ आपल्या दारी' आले आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने आणि कोल्हापुरी चप्पल क्लस्टरच्या सहकार्याने चप्पल लाईन येथे आयोजित ऑन फिल्ड प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. शेजारी माजी उपमहापौर भूपाल शेटे व इतर.

केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव म्हणाले, केंद्राच्या दहा प्रशिक्षित प्रशिक्षकांमार्फत चप्पल लाईन येथील व्यावसायिकांना त्यांच्या व्यवसायाला पूरक अशा बाबींचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. सध्या बाजारातील विविध प्रवाहांची माहिती देऊन त्यासाठी आवश्यक बाबींविषयी त्यांना अवगत करणे असा या प्रशिक्षणाचा उद्देश आहे. यामध्ये विविध विपणन कौशल्यांबरोबरच प्रदर्शन कौशल्य, जाहिरात कौशल्य, प्रसिद्धी कौशल्य, ग्राहक सुसंवाद कौशल्य, विक्री मूल्य निर्धारण कौशल्य, साठा कौशल्य, ब्रँडिंग व पॅकिंग कौशल्य, वर्तन कौशल्य, स्थानिक व बाह्य ग्राहकांशी संवाद कौशल्य आदी अनेक बाबींचे प्रशिक्षण चप्पल लाईनमधील व्यावसायिकांना दिले जाणार आहे.

कोल्हापूर क्लस्टरचे भूपाल

# चप्पल विक्रेत्यांना कौशल्य प्रशिक्षण



शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे चप्पल लाईन येथे आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमाविषयी उपस्थित मान्यवरांना माहिती देताना केंद्राचे समन्वयक डॉ. ए.एम. गुरव.

कोल्हापूर टाइम्स टीम

'कोल्हापूरचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आणि वैभव असणाऱ्या कोल्हापुरी चप्पलचे निर्माते आणि विशेषतः विक्रेते यांना बाजारामधील नवप्रवाहांची जाणीव करून देणे आणि त्यांच्या विपणन पद्धतीमध्ये कालसुसंगत बदल घडवून आणण्यासाठी शिवाजी विद्यापीठ प्रतिबद्ध आहे. त्या दृष्टीनेच विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या माध्यमातून थेट कोल्हापूरच्या चप्पल लाइनमध्येच एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला. एका अर्थाने या चप्पल विक्रेत्यांच्या कौशल्य

## शिवाजी विद्यापीठाचा उपक्रम

विकासासाठी 'विद्यापीठ आपल्या दारी' आले आहे', अशी भावना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने आणि कोल्हापुरी चप्पल क्लस्टरच्या सहकार्याने चप्पल लाइन येथे आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय ऑन-फिल्ड प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

केंद्राचे समन्वयक डॉ. ए.एम. गुरव यांनी सांगितले की, 'प्रशिक्षणामध्ये विविध विपणन कौशल्यांबरोबरच प्रदर्शन कौशल्य, जाहिरात कौशल्य, प्रसिद्धी कौशल्य, ग्राहक सुसंवाद कौशल्य, विक्री मूल्य निर्धारण कौशल्य, साठा कौशल्य, ब्रँडिंग व पॅकिंग कौशल्य, वर्तन कौशल्य, संवाद कौशल्य आदी अनेक बाबींचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.'

महेश चव्हाण यांनी आभार मानले. यावेळी डॉ. केदार मारुलकर, क्लस्टरचे अध्यक्ष अरुण सातपुते यांच्यासह सर्व प्रशिक्षक उपस्थित होते. डॉ. व्ही.एस. खंडागळे, डॉ. गजानन राशिनकर, डॉ. के.बी. पाटील, डॉ. पी.एम. देवळी, शिवप्रसाद शेटे, प्रियांका नायक-तिवरे या प्रशिक्षकांनी कोल्हापुरी चप्पल विक्रेत्यांना विविध कौशल्यांचे प्रशिक्षण दिले.

### महत्त्वाचा टप्पा

माजी उपमहापौर व 'कोल्हापूर क्लस्टर'चे भूपाल शेटे म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठाने कोल्हापुरी चप्पल व्यावसायिकांसाठी सातत्याने सकारात्मक भूमिका घेऊन काम चालविले आहे. त्याचा परिणाम म्हणून चप्पल निर्माते आणि व्यावसायिकांमध्येही एक प्रकारची जागृती होऊ लागली आहे. जागतिक प्रवाहांचा वेध घेत त्यामध्ये स्वतःचे स्थान निर्माण करण्यासाठी विद्यापीठ चप्पल व्यावसायिकांना करीत असलेली मदत स्वागतार्ह आहे. त्या दृष्टीने चप्पल लाइनमधील प्रशिक्षण हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरेल.'

# विक्रेत्यांच्या विपणन पद्धतीत कालसुसंगत बदलासाठी प्रतिबद्ध

## - कुलसचिव डॉ. नांदवडेकर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

कोल्हापूरचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आणि वैभव असणाऱ्या कोल्हापुरी चप्पलचे निर्माते आणि विशेषतः विक्रेते यांना बाजारामधील नवप्रवाहांची जाणीव करून देणे, त्यांच्या विपणन पद्धतीमध्ये कालसुसंगत बदल घडवून आणण्यासाठी शिवाजी विद्यापीठ प्रतिबद्ध आहे. त्या दृष्टीनेच विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या माध्यमातून थेट कोल्हापूरच्या चप्पल लाईनमध्येच एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात येत आहे. एका अर्थाने या चप्पल विक्रेत्यांच्या कौशल्य विकासासाठी 'विद्यापीठ आपल्या दारी' आले आहे, अशी भावना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी बुधवारी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे आणि कोल्हापुरी चप्पल क्लस्टरच्या सहकार्याने चप्पल लाईन येथे आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय ऑन-फिल्ड प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव म्हणाले, केंद्राच्या दहा प्रशिक्षकांमार्फत चप्पल लाईन येथील व्यावसायिकांना त्यांच्या व्यवसायाला पूरक अशा बाबींचे प्रशिक्षण देण्याबरोबरच सध्या बाजारातील विविध प्रवाहांची माहिती देऊन त्यासाठी आवश्यक बाबींविषयी त्यांना अवगत करणे, असा या प्रशिक्षणाचा उद्देश आहे. यामध्ये विविध विपणन कौशल्यांबरोबरच प्रदर्शन कौशल्य, जाहिरात, प्रसिद्धी, ग्राहक सुसंवाद, विक्री मूल्य निर्धारण, साठा, ब्रँडिंग व पॅकिंग, वर्तन, स्थानिक व बाह्य ग्राहकांशी संवाद कौशल्य आदी अनेक बाबींचे प्रशिक्षण व्यावसायिकांना देण्यात येणार आहे.



**कोल्हापूर : चप्पल लाईन येथे आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. शेजारी भूपाल शेट्ये, अरुण सातपुते व प्रशिक्षक.**

याप्रसंगी कोल्हापूर क्लस्टरचे भूपाल शेट्ये म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने कोल्हापुरी चप्पल व्यावसायिकांसाठी सातत्याने सकारात्मक भूमिका घेऊन काम चालवले आहे. त्याचा परिणाम म्हणून चप्पल निर्माते आणि व्यावसायिकांमध्येही एक प्रकारची जागृती होऊ लागली आहे. जागतिक प्रवाहांचा वेध घेत त्यामध्ये स्वतःचे स्थान निर्माण करण्यासाठी विद्यापीठ चप्पल व्यावसायिकांना करत असलेली मदत स्वागतार्ह आहे. त्या दृष्टीने आजचे चप्पल लाईनमधील प्रशिक्षण हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरेल.

यावेळी महेश चव्हाण यांनी आभार मानले. डॉ. केदार मारुलकर, क्लस्टरचे अध्यक्ष अरुण सातपुते यांच्यासह सर्व प्रशिक्षक उपस्थित होते.

दरम्यान, बुधवारी दिवसभरात डॉ. गुरव, डॉ. मारुलकर यांच्यासह डॉ. व्ही. एस. खंडागळे, डॉ. गजानन राशिनकर, डॉ. के. बी. पाटील, डॉ. पी. एम. देवळी, शिवप्रसाद शेटे, प्रियांका नायक-तिवरे आणि लिटॉन या प्रशिक्षकांनी कोल्हापुरी चप्पल विक्रेत्यांना विविध कौशल्यांचे प्रशिक्षण दिले.

# विद्यापीठाकडून चप्पल व्यावसायिकांमध्ये जागृती

## कोल्हापूर क्लस्टरचे भूपाल शेटे : विद्यापीठाकडून चप्पल लाईनमध्ये प्रशिक्षण

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यापीठाने कोल्हापुरी चप्पल व्यावसायिकांसाठी सातत्याने सकारात्मक भूमिका घेतली असून परिणामी चप्पल निर्मति आणि व्यावसायिकांमध्येही एक प्रकारची जागृती होऊ लागली आहे. जागतिक प्रवाहांचा वेध घेत त्यामध्ये स्वत:चे स्थान निर्माण करण्यासाठी विद्यापीठ चप्पल व्यावसायिकांना करीत असलेली मदत स्वागतार्ह आहे, असे प्रतिपादन कोल्हापूर क्लस्टरचे भूपाल शेटे यांनी केले.

विद्यापीठातील कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि कोल्हापुरी चप्पल क्लस्टरच्या यांच्या संयुक्त विधमाने कोल्हापूर शहरातील चप्पल लाईनमध्ये एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. चप्पल विक्रेत्यांच्या कौशल्य विकासासाठी 'विद्यापीठ आपल्या दारी' असाच उपक्रम होता. यप्रसंगी ते बोलत होते. या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते करण्यात आले.



**कोल्हापूर : चप्पल लाईनमध्ये आयोजित प्रशिक्षणात मार्गदर्शन करताना कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव. सोबत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, कोल्हापूर क्लस्टरचे भूपाल शेटे आदी.**

केंद्राचे समन्वयक डॉ. ए.एम. गुरव म्हणाले, केंद्राच्या दहा प्रशिक्षित प्रशिक्षकांच्या मार्फत चप्पल लाईन येथील व्यावसायिकांना त्यांच्या व्यवसायाला पूरक अशा बाबींचे प्रशिक्षण तसेच सध्या बाजारातील विविध प्रवाहांची देखील माहिती देण्यात आली. विविध विपणन कौशल्यांबरोबरच प्रदर्शन कौशल्य, जाहिरात कौशल्य, प्रसिद्धी कौशल्य, ग्राहक सुसंवाद कौशल्य, विक्री मूल्य निर्धारण कौशल्य, साठा कौशल्य, ब्रँडिंग व पॅकिंग कौशल्य, वर्तन कौशल्य, स्थानिक व बाह्य ग्राहकांशी संवाद कौशल्य आदी बाबींचे प्रशिक्षण व्यावसायीकांना देण्यात येणार आहे.

डॉ. व्ही. एस. खंडागळे, डॉ. गजानन राशिनकर, डॉ. के.बी. पाटील, डॉ. पी.एम. देवळी, शिवप्रसाद शेटे, प्रियांका नायक–तिवरे यांनी प्रशिक्षण दिले. महेश चव्हाण यांनी आभार मानले. यावेळी डॉ. केदार मारुलकर, क्लस्टरचे अध्यक्ष अरुण सातपुते आदी उपस्थित होते.

लोकमत

## अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा : साखळी फेरीचा दुसरा दिवस

# शिवाजी विद्यापीठाची 'जम्मू'वर मात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या अखिल भारतीय कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत बुधवारी झालेल्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने जम्मू केंद्रीय विद्यापीठावर तब्बल ९२ धावांनी विजय मिळविला. सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाचा कर्णधार सागर पवारसह राजेश कोळी यांनी दमदार ९४ धावांची सलामी भागीदारी केली.



राजेश कोळी

सकाळच्या सत्रात झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना शिवाजी विद्यापीठाने २० षटकांत ४ बाद १५५ धावा केल्या. शिवाजी विद्यापीठ संघाचे कर्णधार सागर पवारने ५२, राजेश कोळीने ५२ धावा केल्या.

प्रत्युत्तरादाखल खेळताना जम्मू विद्यापीठाचा संघाने १६.४ षटकांत अवघ्या ६३ धावांतच गारद झाला. गोलंदाजी करताना शिवाजी विद्यापीठ संघाकडून विश्वनाथ वरुटे याने ४, तर योगेश दळवी आणि रमेश ढोणुक्षे यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. राजेश कोळीला 'सामनावीर' ठरला.

नसीर अतार



कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या अखिल भारतीय कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत बुधवारी जम्मू विद्यापीठ संघ विरुद्ध अजमेरच्या महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ संघ यांच्यामध्ये झालेल्या सामन्यातील स्पर्धेत फलंदाजी करताना जम्मूच्या खेळाडूनी फटकेबाजी केली.

## उद्याचे सामने

**सकाळचे सत्र** (सकाळी ८.३० वा.)

1) महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ, अजमेर वि. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

2) मुंबई विद्यापीठ, मुंबई वि. पंजाबी विद्यापीठ, पतियाळा

3) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर वि. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**दुपारचे सत्र** (दु. १ वा.)

४) शेर-ए-काश्मीर कृषी विज्ञान व तंत्रज्ञान विद्यापीठ, जम्मू वि. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

५) हिमाचल प्रदेश विद्यापीठ, सिमला वि. महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहटक

६) महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी वि. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ संघावर तब्बल १४२ धावांनी विजय मिळविला. प्रथम फलंदाजी करताना

मोबदल्यात तब्बल २२८ धावा केल्या. जम्मू विद्यापीठ संघाच्या दीपक कुमारने धडाकेबाज फलंदाजीचे दर्शन

केली. प्रत्युत्तरादाखल अजमेर संघाला २० षटकांत ९ बाद ८६ धावाच करता आल्या. जम्मूच्या विजयात मोलाचा वाटा उचलणारा दीपक कुमार 'सामनावीर' ठरला.

पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाला नवी दिल्लीच्या जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठाकडून पराभव स्वीकारावा लागला. पुणे विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करताना १९.५ षटकांत सर्व बाद ११२ धावा केल्या. 'जामिया मिलिया'च्या संघाने हे आव्हान १६ षटकांत अवघ्या ३ गड्यांच्या मोबदल्यात पार केले आणि ७ गडी राखून सामना जिंकला. १५ धावांत ३ बळी मिळविणारा व १४

मोहम्मद अखलाख 'सामनावीर' ठरला.

राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाला सिमल्याच्या हिमाचल प्रदेश विद्यापीठाकडून ४ गडी राखून पराभव स्वीकारावा लागला. राहुरीच्या संघाने प्रथम फलंदाजी करताना जालंदर धनवटेच्या ६९ धावांच्या खेळीच्या जोरावर १८.१ षटकांत सर्व बाद १२८ धावांचे आव्हान सिमल्याच्या संघासमोर ठेवले. हे आव्हान सिमला विद्यापीठाने १९ षटकांत ६ गड्यांच्या मोबदल्यात पार केले. ४ बळी घेऊन विजयात मोलाचा वाटा उचलणाऱ्या सिमल्याच्या धरम प्रकाशला 'सामनावीर' घोषित करण्यात आले.

तत्पूर्वी, सकाळच्या सत्रातील दुसऱ्या सामन्यात रोहटकच्या महर्षी दयानंद विद्यापीठाने चंदीगढच्या पंजाब विद्यापीठाचा ८ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना चंदीगढच्या संघाने २० षटकांत ६ बळींच्या मोबदल्यात १४९ धावा केल्या. रोहटक विद्यापीठाच्या संघाने १९ षटकांत अवघ्या २ बळींत पार केले. नरेंद्र कुमारच्या नाबाद ९२ धावा केल्या.

तिसरा सामना लाला लजपतराय पशुविज्ञान विद्यापीठ, हिस्सार संघाने दीनदयाल उपाध्याय गोरखपूर विद्यापीठ, गोरखपूर संघावर विजय

# यजमान 'शिवाजी'सह 'जामिया', 'जम्मू' संघांचे विजय

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

**कुलगुरू चषक क्रिकेट स्पर्धा**

शिवाजी विद्यापीठाचे स्टार क्रिकेटपटू आणि कर्णधार सागर पवार व राजेश कोळी यांच्या दमदार ९४ धावांच्या सलामी भागीदारीच्या जोरावर कुलगुरू चषक क्रिकेट स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने जम्मू केंद्रीय विद्यापीठ संघावर तब्बल ९२ धावांनी विजय मिळवला. अन्य सामन्यांत जामिया मिलिया, जम्मू, रोहतक आदी संघांनी प्रतिस्पर्ध्यांवर मात केली.

सकाळच्या सत्रात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला उतरलेल्या शिवाजी विद्यापीठ संघाचा कर्णधार पवार आणि कोळी यांनी दमदार सलामी दिली. पवार ५२ धावांवर बाद झाले. कोळी ५२ धावांवर नाबाद राहिले. त्यांच्या भागीदारीमुळे संघाने २० षटकांत ४ बाद १५५ अशी धावसंख्या उभारली. प्रत्युत्तरादाखल खेळताना जम्मू विद्यापीठाचा संघ १६.४ षटकांत अवघ्या ६३ धावांत गारद झाला. फलंदाजांनी आपली कामगिरी चोख बजावल्यानंतर शिवाजी विद्यापीठाच्या गोलंदाजांनीही पाहुण्या संघाला जखडून ठेवण्यात यश मिळवले. विश्वनाथ वरुटे याने ४ तर योगेश दळवी आणि रमेश ढोणुक्षे यांनी प्रत्येकी २ बळी मिळवले. विजयात महत्त्वाचा वाटा उचलणारे राजेश कोळी सामनावीर ठरले.

दुपारच्या सत्रातला जम्मू विद्यापीठ, जम्मू आणि अजमेरच्या महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ यांच्यातील सामना सर्वाधिक चर्चेचा ठरला. जम्मू विद्यापीठाच्या दीपक कुमार याने धडाकेबाज फलंदाजीचे दर्शन घडवताना १०२ धावांची शतकी खेळी केली. जम्मूच्या विजयात मोलाचा वाटा उचलणारा दीपक कुमार सामनावीर ठरला.

पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाला नवी दिल्लीच्या जामिया मीलिया इस्लामीया विद्यापीठाकडून पराभव स्वीकारावा लागला. १५ धावांत ३ बळी मिळवणारा व १४ धावा करणारा जामिया मिलियाचा मोहम्मद अखलाख सामनावीर ठरला.

राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाला सिमल्याच्या हिमाचल प्रदेश विद्यापीठाकडून ४ गडी राखून पराभव स्वीकारावा लागला. राहुरीच्या संघाने प्रथम फलंदाजी करताना जालंदर धनवटेच्या ६९ धावांच्या खेळीच्या जोरावर १८.१ षटकांत सर्व बाद १२८ धावांचे आव्हान सिमल्याच्या संघासमोर ठेवले. हे आव्हान सिमला विद्यापीठाने १९ षटकांत ६ गड्यांच्या मोबदल्यात पार केले. ४ बळी घेऊन विजयात मोलाचा वाटा उचलणाऱ्या सिमल्याच्या धरम प्रकाशला सामनावीर घोषित करण्यात आले.


तत्पूर्वी, सकाळच्या सत्रातील दुसऱ्या सामन्यात रोहतकच्या महर्षी दयानंद विद्यापीठाने चंदीगडच्या पंजाब विद्यापीठाचा ८ गडी राखून पराभव केला. दीनदयाळ उपाध्याय गोरखपूर विद्यापीठ, गोरखपूर वि. लाला लजपतराय पशु विज्ञान विद्यापीठ, हिस्सार यांच्यात झालेला सामन्यात गोरखपूरने प्रथम फलंदाजी करताना १७ षटकांत सर्व बाद ७४ धावा केल्या. हिस्सार संघाने एकही गडी न गमावता हा सामना अवघ्या ५.५ षटकांत अगदी एकतर्फी जिंकला.

# शिवाजी विद्यापीठाचा जम्मूवर विजय

## कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा; जामिया मिलिया, रोहटक संघही विजयी

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता २० : शिवाजी विद्यापीठाचे कप्तान सागर पवार आणि राजेश कोळी यांच्या ९४ धावांच्या सलामी भागीदारीच्या जोरावर शिवाजी विद्यापीठाच्या संघाने जम्मू केंद्रीय विद्यापीठ संघावर ९२ धावांनी विजय मिळवला. अन्य सामन्यांत जामिया मिलिया, रोहटक आदी संघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळविले. सकाळच्या सत्रात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला उतरलेल्या शिवाजी विद्यापीठ संघाचे कप्तान सागर पवार आणि राजेश कोळी यांनी दमदार सलामी दिली.**



**कोल्हापूर : अखिल भारतीय कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत जम्मू केंद्रीय विद्यापीठाविरुद्धच्या सामन्यातील क्षण.**

सागर पवार ५२ धावांवर बाद झाले. राजेश कोळी ५२ धावांवर नाबाद राहिले. त्यांच्या भागीदारीमुळे शिवाजी विद्यापीठाने २० षटकांत ४ बाद १५५ अशी धावसंख्या उभारली. प्रत्युत्तरादाखल जम्मू विद्यापीठाचा संघ १६.४ षटकांत अवघ्या ६३ धावांत गारद झाला. विश्वनाथ वरुटे याने ४, तर योगेश दळवी आणि रमेश ढोणुक्षे यांनी प्रत्येकी २ बळी मिळविले. विजयात महत्त्वाचा वाटा उचलणारे राजेश कोळी सामनावीर ठरले.

दुपारच्या सत्रातला सामना जम्मू विद्यापीठ, जम्मू आणि अजमेरच्या महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ यांच्यात झाला. जम्मू विद्यापीठाच्या दीपक कुमार याने धडाकेबाज फलंदाजी करत१०२ धावांची शतकी खेळी केली. या जोरावर जम्मू संघाने अजमेरसमोर ३ गड्यांच्या मोबदल्यात तब्बल २२८ धावांचे मोठे आव्हान ठेवले. प्रत्युत्तरादाखल अजमेर संघाला २० षटकांत ९ बाद ८६ धावाच करता आल्या.

पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाला नवी दिल्लीच्या जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठाकडून पराभव स्वीकारावा लागला. पुणे विद्यापीठाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना १९.५ षटकांत सर्व बाद ११२ धावा केल्या. जामिया मिलियाच्या संघाने हे आव्हान १६ षटकांत अवघ्या ३ गड्यांच्या मोबदल्यात पार केले आणि ७ गडी राखून सामना जिंकला.

राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाला सिमल्याच्या हिमाचल प्रदेश विद्यापीठाकडून ४ गडी राखून पराभव स्वीकारावा लागला. राहुरीच्या संघाने प्रथम फलंदाजी करताना जालंदर धनवटेच्या ६९ धावांच्या खेळीच्या जोरावर १८.१ षटकांत सर्व बाद १२८ धावांचे आव्हान सिमल्याच्या संघासमोर ठेवले. हे आव्हान सिमला विद्यापीठाने १९ षटकांत ६ गड्यांच्या मोबदल्यात पार केले. रोहटकच्या महर्षी दयानंद विद्यापीठाने चंदीगढच्या पंजाब विद्यापीठाचा ८ गडी राखून पराभव केला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना चंदीगढच्या संघाने २० षटकांत ६ बळींच्या मोबदल्यात १४९ धावा केल्या. हे आव्हान सामनावीर नरेंद्र कुमारच्या नाबाद ९२ धावांच्या खेळीच्या बळावर रोहटक विद्यापीठाच्या संघाने १९ षटकांत अवघ्या २ बळींत पार केले.

### १५ धावांत ५ खेळाडूंना केले बाद

दीन दयाल उपाध्याय गोरखपूर विद्यापीठ, गोरखपूर वि. लाला लजपतराय पशुविज्ञान विद्यापीठ, हिस्सार यांच्यात सामना झाला. गोरखपूरने प्रथम फलंदाजी करताना १७ षटकांत सर्व बाद ७४ धावा केल्या. हिस्सार संघाने एकही गडी न गमावता हा अवघ्या ५.५ षटकांत अगदी लीलया एकतर्फी जिंकला. हिस्सार संघाकडून गोलंदाजी करताना गोरखपूरच्या ५ खेळाडूंना १५ धावांत पॅव्हेलियनचा रस्ता दाखविणारा विकास खरब सामनावीर ठरला.

# शिवाजी विद्यापीठाची 'जम्मू'वर ९२ धावांनी मात

## आंतरविद्यापीठ कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा



**कोल्हापूर : अखिल भारतीय कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत जम्मू केंद्रीय विद्यापीठाविरुद्धच्या सामन्यातील एक क्षण.**

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठ क्रिकेट संघाचा कर्णधार सागर पवार आणि राजेश कोळी यांच्या दमदार ९४ धावांच्या सलामी भागीदारीच्या जोरावर शिवाजी विद्यापीठ संघाने जम्मू केंद्रीय विद्यापीठ संघावर तब्बल ९२ धावांनी विजय मिळवला. अन्य सामन्यांत जामिया मिलिया, जम्मू, रोहतक आदी संघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात केली.

सकाळच्या सत्रात नाणेफेक जिंकून शिवाजी विद्यापीठ संघाने प्रथम फलंदाजीला करत २० षटकांत १५५ धावा केल्या. यामध्ये सागर पवार ५२, तर राजेश कोळी याच्या नाबाद ५२ धावांचे योगदान आहे. प्रत्युत्तरादाखल खेळताना जम्मू विद्यापीठाचा संघ १६.४ षटकांत अवघ्या ६३ धावांपर्यंत मजल मारू शकला. विश्वनाथ वरुटे याने ४, तर योगेश दळवी आणि रमेश ढोणुक्षे यांनी प्रत्येकी २ बळी मिळवले. राजेश कोळी सामनावीर ठरला.

दुपारच्या सत्रामध्ये जम्मू संघाने ३ गड्यांच्या मोबदल्यात २२८ धावांचा डोंगर उभा केला. या आव्हानासमोर अजमेरचा महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठाचा संघ दुबळा ठरला. संघाला २० षटकांत ९ बाद ८६ धावाच करता आल्या.

दुपारच्या सामन्यात पुणे विद्यापीठाने १९.५ षटकांत सर्वबाद ११२ धावा केल्या. जामिया मिलियाच्या संघाने हे आव्हान १६ षटकांत अवघ्या ३ गड्यांच्या मोबदल्यात पार केले. राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठ संघाने १८.१ षटकांत सर्वबाद १२८ धावा केल्या, तर सिमल्याच्या हिमाचल प्रदेश विद्यापीठाने १९ षटकांत ६ गड्यांच्या मोबदल्यात पार केले.

तत्पूर्वी, सकाळच्या सत्रामध्ये चंदीगडच्या संघाने २० षटकांत ६ बाद १४९ धावा केल्या. हे ध्येय रोहतक विद्यापीठ संघाने १९ षटकांत अवघ्या २ गड्यांच्या मोबदल्यात पार केले. सकाळचा तिसरा सामन्यात गोरखपूरने १७ षटकांत सर्वबाद ७४ धावा केल्या. हिस्सार संघाने एकही गडी न गमावता अवघ्या ५.५ षटकांत अगदी लीलया एकतर्फी विजय संपादन केला.


# शिवाजी विद्यापीठाची 'जम्मू'वर मात

## 'कुलगुरू' चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

कर्णधार सागर पवार आणि राजेश कोळी यांच्या दमदार ९४ धावांच्या सलामी भागिदारीच्या जोरावर शिवाजी विद्यापीठाच्या संघाने जम्मू केंद्रीय विद्यापीठ संघावर ९२ धावांनी विजय मिळवत आगेकूच केली. दिवसभरातील अन्य सामन्यांत जामिया मिलिया, जम्मू, रोहटक आदी संघांनी प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळविला.

बुधवारी सकाळच्या सत्रातील सामन्यात प्रथम फलंदाजी करत शिवाजी विद्यापीठाने २० षटकांत ४ बाद १५५ धावा केल्या. यात कर्णधार सागर पवार व राजेश कोळी यांनी दमदार सलामी देत प्रत्येकी ५२ धावांची खेळी केली. उत्तरादाखल जम्मू विद्यापीठाचा संघ १६.४ षटकांत अवघ्या ६३ धावांत गुंडळला. यजमान संघाच्या विश्वनाथ वरुटे याने ४ तर योगेश दळवी आणि रमेश ढोणुक्षे यांनी प्रत्येकी २ विकेट



घेतल्या. विजयात महत्त्वाचा वाटा उचलणारा राजेश कोळी सामनावीर ठरला.

दुपारच्या सामन्यात जम्मू विद्यापीठाच्या दीपक कुमार याने धडाकेबाज फलंदाजी करत १०२ धावांची शतकी खेळी केली. या जोरावर जम्मू संघाने अजमेरसमोर ३ गड्यांच्या मोबदल्यात तब्बल २२८ धावांचे मोठे आव्हान ठेवले. उत्तरादाखल अजमेर संघ २० षटकांत ९ बाद ८६ धावांपर्यंत मजल मारू शकला. त्यांचा दीपक कुमार सामनावीर ठरला.

पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाला नवी दिल्लीच्या जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठाकडून पराभव स्वीकारावा लागला. पुणे विद्यापीठाने १९.५ षटकांत सर्व बाद ११२ धावा केल्या. जामिया मिलियाच्या संघाने हे आव्हान १६ षटकांत अवघ्या ३ गड्यांच्या मोबदल्यात पार केले. १५ धावांत ३ बळी मिळविणारा व १४ धावा करणारा जामिया मिलियाचा मोहम्मद अखलाख सामनावीर ठरला.

राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाला सिमला हिमाचल प्रदेश विद्यापीठाकडून ४ गडी राखून पराभव स्वीकारावा लागला. राहुरीच्या संघाने प्रथम फलंदाजी करत जालंदर धनवटेच्या ६९ धावांच्या खेळीच्या जोरावर १८.१ षटकांत सर्व बाद १२८ धावांचे आव्हान सिमल्याच्या संघासमोर ठेवले. हे आव्हान सिमला विद्यापीठाने १९ षटकांत ६ गड्यांच्या मोबदल्यात पार केले. ४ बळी घेऊन विजयात मोलाचा वाटा उचलणाऱ्या सिमलाच्या धरम प्रकाशला सामनावीर घोषित करण्यात आले.

रोहटकच्या महर्षी दयानंद विद्यापीठाने चंदीगडच्या पंजाब विद्यापीठाचा ८ गडी राखून पराभव केला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना चंदीगडच्या संघाने २० षटकांत ६ बळींच्या मोबदल्यात १४९ धावा केल्या. हे आव्हान सामनावीर नरेंद्र कुमारच्या नाबाद ९२ धावांच्या खेळीच्या बळावर रोहटक विद्यापीठाच्या संघाने १९ षटकांत अवघ्या २ बळींत पार केले.

दीनदयाल उपाध्याय गोरखपूर विद्यापीठ, गोरखपूर वि. लाला लजपतराय पशुविज्ञान विद्यापीठ, हिस्सार यांच्यात झाला. गोरखपूरने प्रथम फलंदाजी करताना १७ षटकांत सर्व बाद ७४ धावा केल्या. हिस्सार संघाने एकही गडी न गमावता हा अवघ्या ५.५ षटकांत अगदी लीलया एकतर्फी जिंकला.

हिस्सार संघाकडून गोलंदाजी करताना गोरखपूरच्या ५ खेळाडूंना १५ धावांत पॅव्हेलियनचा रस्ता दाखविणारा विकास खरब सामनावीर ठरला.

## व्याख्यान आज

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे बँक ऑफ इंडिया अध्यासन आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. २१) सकाळी अकरा वाजता मानव्यविद्या सभागृहात 'सायबर फ्रॉड व ई-पेमेंट' या विषयावर विशेष व्याख्यान होणार आहे. यासाठी आरबीआयचे जनरल मॅनेजर तपवन प्रधान व त्यांचे सहकारी तसेच कोल्हापूर जिल्हा अग्रणी बँक, बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. विजय ककडे यांनी केले आहे.

# छायाचित्र स्पर्धेत शुभम, संकेत प्रथम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'शिवाजी विद्यापीठ परिसर छायाचित्रण स्पर्धे'त शुभम रमेश हत्तरकी आणि संकेत उदय साळी या दोघांना प्रथम क्रमांक विभागून देण्यात आला. त्यांना प्रत्येकी रु. १२,५०० रोख व प्रमाणपत्र असे पारितोषिक प्रदान करण्यात येणार आहे. स्पर्धेतील द्वितीय व तृतीय क्रमांकही विभागून देण्यात आले आहेत. सुंदरकुमार कांबळे व सुभाष वाणी यांना विभागून द्वितीय क्रमांक देण्यात आला. त्यांना रु. ७५०० रोख व प्रमाणपत्र असे पारितोषिक देण्यात येईल. उदयणादित्य एस. पाटील व युवराज जगन्नाथ जगताप यांना विभागून तृतीय क्रमांक देण्यात आला असून त्यांना प्रत्येकी रु. ५००० रोख व प्रमाणपत्र देण्यात येईल.

# ‘सायबर फ्रॉड व ई-पेमेंट’ विषयावर विद्यापीठात आज व्याख्यान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाचे बँक ऑफ इंडिया अध्यासन आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. २१) सकाळी ११ वाजता ‘सायबर फ्रॉड व ई-पेमेंट’ या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात विद्यापीठातील कर्मचारी, तसेच विद्यार्थी यांच्यासाठी हे विशेष व्याख्यान होणार आहे. आरबीआयचे जनरल मॅनेजर तपवन प्रधान व त्यांचे सहकारी तसेच कोल्हापूर जिल्हा अग्रणी बँक, बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास विद्यार्थी, कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. विजय ककडे यांनी केले आहे.

लोकमत

# सौरभ पाटीलची शिवाजी विद्यापीठ कबड्डी संघात निवड

**वडणगे :** वडणगे (ता. करवीर) येथील जय किसान क्रीडा मंडळाचा खेळाडू सौरभ बाळासाहेब पाटील यांची राजस्थान (कोटा) येथे दि. १९ ते २२ नोव्हेंबर या कालावधीत होणाऱ्या आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ कबड्डी संघात निवड झालेली आहे. त्याला मंडळाचे अध्यक्ष बी. एच. पाटील, सुरेश



पोवार, संभाजी देवणे, सुरेश जावळे, कुंडलिक पाटील, जगन्नाथ चौगले, प्रा. संभाजी पाटील, प्रा. रमेश भेंडीगरे, प्रा. प्रशांत पाटील तसेच प्रशिक्षक रवींद्र पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

Hello Kolhapur
Page No. 7 Nov 21, 2019
Powered by: erelego.com

लोकमत

# ई-पेमेंट विषयावर आज व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे बँक ऑफ इंडिया अध्यासन आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्यातर्फे आज, गुरुवारी सकाळी ११ वाजता मानव्यविद्या सभागृहात 'सायबर फ्रॉड, ई-पेमेंट' या विषयावर विद्यापीठातील कर्मचारी तसेच विद्यार्थी यांच्यासाठी विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

यासाठी आरबीआयचे जनरल मॅनेजर तपवन प्रधान व त्यांचे सहकारी तसेच कोल्हापूर जिल्हा अग्रणी बँक, बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. विजय ककडे यांनी केले आहे.

Kolhapur Main
Page No. 4 Nov 21, 2019
Powered by: erelego.com

लोकमत

# परीक्षा अर्ज भरण्यास प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापाठातील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये विधि, बी.एड., बी.एड.- एम.एड., बी.ए., बी.एड., बी.पी.एड., एम.एड. भाग १ करिता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा अर्ज भरण्यासाठी तारखा जाहीर केल्या.

विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात वा पदव्युत्तर अधिविभागामध्ये अर्ज भरण्याची तारीख विनाविलंब शुल्क २ ते ११ डिसेंबर, विलंब शुल्कासहीत १२ ते १४ डिसेंबर, अतिविलंब शुल्कासह १५ ते १७ डिसेंबर आहे. ऑनलाईन परीक्षा अर्जासाठी लिंक सुरु करण्यात येत असून, या कालावधीत विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरावेत, असे आवाहन केले आहे.

Hello Kolhapur
Page No. 2 Nov 21, 2019
Powered by: erelego.com